महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन उपक्रम)
सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५
दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
संकेतस्थळ : www.mahadiscom.in
वाणिज्य विभाग, प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई - मेल : cecomm@mahadiscom.in

**क्र. पीआर-३/मुख्यमंत्री कृषी संजीवनी-२०१७/** 028237 **दिनांक :** 18 NOV 2017

**वाणिज्य परिपत्रक क्र.** २९५

**विषय:** कृषी ग्राहकांकडील वीज बिल थकबाकीमध्ये सवलत देण्यासाठी "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " ला मुदतवाढ देण्याबाबत.

**संदर्भ:** १) शासन निर्णय क्र.कृसंयो-२०१७/प्र.क्र.४२५/ऊर्जा-५, दि.३१.१०.२०१७.
२) शासनाचे समक्रमांकीत पत्र दिनांक ०१.११.२०१७.
३) वाणिज्य परिपत्रक क्र.२९४ दि.१.११.२०१७
४) शासन संकिर्ण २०१७/प्र.क्र.४२५/ऊर्जा-५ दि.१६.११.२०१७.

वरील संदर्भातील क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र.३ च्या वाणिज्य परिपत्रकाद्वारे "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७ " राबविण्यात येत आहे.

१) या योजनेत सहभागी होण्याकरीता माहे जून २०१७ चे त्रैमासिक चालू वीज देयक भरण्याची मुदत दि.१५.११.२०१७ पर्यंत होती. शासन निर्देश संदर्भ क्र. ४ नुसार सदर मुदतवाढ दि.३० नोव्हेंबर २०१७ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

२) विद्युत पुरवठा चालू असलेल्या कृषी ग्राहकांचा वीज पुरवठा दि.३०.११.२०१७ पर्यंत खंडीत करु नये. विद्युत पुरवठा चालू असलेल्या कृषी ग्राहकाने सदर योजनेत भाग न घेतल्यास दि.३०.११.२०१७ नंतर विद्युत पुरवठा खंडीत करण्यात येईल.

३) सर्व क्षेत्रिय कार्यालयानी सदर योजनेत सहभागी होण्याच्या मुदतवाढीबाबत गांव पातळीपर्यंत व्यापक प्रसिध्दी द्यावी.

४) अनधिकृत वीज जोडण्याविरुध्द नियमानुसार कारवाई करावी.

५) सदर योजनेतील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी "मुख्यमंत्री कृषी संजीवनी योजना २०१७" या योजनेची परिणामकारक अंमलबजावणी करण्याकरीता सर्वतोपरी प्रयत्न करावे.

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे.**